# महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाच्या योजना

**प्रस्तावना :**

मराठी साहित्य संस्कृती व कला या क्षेत्रांमध्ये महाराष्ट्रास लाभलेला थोर वारसा जतन व संवर्धन करण्यासाठी आणि विविध विषयांवरील मूलभूत संशोधन व प्रकाशन यांना उत्तेजन देण्याच्या हेतूने महाराष्ट्र शासनाने १९ नोव्हेंबर, १९६० मध्ये महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाची स्थापना केली. अशा तऱ्हेच्या मंडळाची मूळ संकल्पना महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री स्व. यशवंतरावजी चव्हाण यांची होती. संपूर्ण भारतात राज्य पातळीवर स्थापन करण्यात आलेले साहित्य-संस्कृतीविषयक कार्य करणारे हे पहिलेच मंडळ होय. मंडळाचे पहिले अध्यक्ष तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी हे होते.

## १) मंडळाचे मुख्य उद्दिष्ट

महाराष्ट्राचे साहित्य, संस्कृती आणि इतिहास यांसारख्या विषयांवर मराठीमध्ये ग्रंथरचना करण्यासाठी विविध वाङ्मयीन योजनांना चालना देणे, मदत करणे व अशा योजना मंडळाने स्वत: हाती घेणे हे साहित्य आणि संस्कृती मंडळाचे मुख्य उद्दिष्ट आहे. सदर उद्दिष्ट साध्य करण्यासाठी आणि आधुनिक महाराष्ट्राच्या वाङ्मयीन गरजा लक्षात घेऊन सुरुवातीपासूनच मंडळ मौलिक व बहुविध वाङ्मयीन निर्मितीसाठी कार्यरत आहे. साहित्य संस्कृतीच्या विकासासाठी साधनस्वरूप असे मौलिक ग्रंथ स्वस्त किंमतीत मराठी वाचकांना उपलब्ध करून देण्यावर मंडळाने लक्ष केंद्रित केले आहे. मंडळाच्या साहित्य संवर्धनाच्या उद्दिष्टपूर्तीसाठी मंडळामार्फत खालील योजना/उपक्रम राबविले जातात.

## (२) मंडळाच्यावतीने राबविण्यात येणाऱ्या प्रमुख योजना / उपक्रम यांची सविस्तर माहिती

(१) मंडळाची पुस्तक प्रकाशन योजना - महाराष्ट्राचे साहित्य , संस्कृती आणि महाराष्ट्राचा इतिहास याविषयीच्या वैचारिक , समीक्षात्मक , चरित्रात्मक आदि ग्रंथांचे संपादन, संशोधन व प्रकाशन , महाराष्ट्राचे शिल्पकार योजना

(२) ललित व ललितेतर वाङ्मयाच्या प्रकाशनार्थ अनुदान योजना

(३) नवलेखक उत्तेजनार्थ अनुदान योजना

(४) नवलेखकांची चर्चासत्रे / कार्यशाळांना अनुदान योजना

(५) साहित्य संस्थांना अनुदान

(६) अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनास अनुदान

(७) नियतकालिकांना अनुदान

(८) स्व. यशवंतराव चव्हाण राज्य वाङ्मय पुरस्कार योजना

(९) विंदा करंदीकर जीवनगौरव पुरस्कार

(१०) श्री. पु. भागवत पुरस्कार

(११) अन्य मराठी साहित्य संमेलन अनुदान योजना

(१२) बृहद्ग्रंथ योजना

*** महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाच्या प्रमुख योजनांची सविस्तर माहिती -**

**१) मंडळाची पुस्तक प्रकाशन योजना -**

खाजगी प्रकाशकांमार्फत साधारणत: जी पुस्तके प्रकाशित करण्यास नकार दिला जातो, अशी पुस्तके जिज्ञासू , चोखंदळ तसेच सामान्य वाचकास कमी किंमतीत उपलब्ध करुन देण्याची ही योजना आहे. सदर योजनेत वैचारिक, समीक्षात्मक, चरित्रात्मक इत्यादी विषयांवरील ग्रंथ प्रकाशित केले जातात. तसेच मंडळाने प्रकाशित केलेल्या पुस्तकांचे मागणीनुसार पुनर्मुद्रणही केले जाते. सदर योजनेनुसार मंडळाने आतापर्यंत ५८४ पुस्तके प्रकाशित केली आहेत.

**२) ललित व ललितेतर वाङ्मयाच्या प्रकाशनार्थ अनुदान -**

या योजने अंतर्गत मराठीतील वैचारिक विषयावरील वैशिष्टयपूर्ण संशोधनात्मक अशा उच्च दर्जाच्या लेखनाचा, तसेच ललित साहित्यातील वाङ्मयीन दृष्टीने गुणवत्तापूर्ण असलेल्या लेखनाचा विचार अनुदानासाठी केला जातो.

**३) नवलेखक उत्तेजनार्थ अनुदान योजना -**

या योजने अंतर्गत ज्यांचे एकही पुस्तक प्रकाशित झाले नाही, अशा नवलेखकांना कथा, कादंबरी, ललितगद्य, काव्य, नाटक (एकांकिका), बालवाङ्मय या लेखनाच्या प्रकाशनासाठी मंडळाकडून अनुदान दिले जाते. आतापर्यंत सदर योजनेअंतर्गत २३११ नवलेखकांची पुस्तके प्रकाशित झाली आहेत.

**४) नवलेखकांची चर्चासत्रे / कार्यशाळांना अनुदान योजना -**

नवलेखकांना ज्येष्ठ साहित्यिकांचे मार्गदर्शन व्हावे, त्यांच्या लेखनात सुधारणा व्हावी, म्हणून महाराष्ट्रात विविध ठिकाणी नवलेखकांची १० चर्चासत्रे / कार्यशाळा आयोजित केल्या जातात. मंडळाकडून महाराष्ट्रभर आजमितीपर्यंत १११ चर्चासत्रे / कार्यशाळा आयोजित करण्यात आल्या आहेत.

**५) साहित्य संस्थांना अनुदान -**

या अनुदान योजनेतर्गत शासनामार्फत १९८९-९० सालापासून मराठी साहित्य आणि संस्कृतीच्या विकासासाठी - १) अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळ, २) विदर्भ साहित्य संघ, नागपूर, ३) मराठवाडा साहित्य परिषद, औरंगाबाद, ४) महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे, ५) मुंबई मराठी साहित्य संघ, मुंबई, ६) कोकण मराठी साहित्य परिषद, रत्नागिरी, ७) दक्षिण महाराष्ट्र साहित्य सभा, कोल्हापूर अशा ७ संस्थांना दरवर्षी प्रत्येकी रक्कम रु.५.०० लाख रुपये अनुदान देण्यात येत होते. वित्तीय वर्ष २०१८-१९ पासून सदर अनुदान रु. १०.०० लक्ष करण्यात आले आहे.

**६) अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनास अनुदान -**

अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाकडून दरवर्षी अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन आयोजित केले जाते. या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनासाठी रु. २५.०० लाखाचे अनुदान मंडळामार्फत दिले जात होते. वित्तीय वर्ष २०१८-१९ पासून सदर अनुदान रु. ५०.०० लक्ष करण्यात आले आहे.

**७) नियतकालिकांना अनुदान -**

मराठी भाषेत विविध विषयांवर प्रसिध्द होणाऱ्या ५८ नियतकालिकांना प्रतिवर्षी अनुदान वितरित केले जाते.

**८) स्व. यशवंतराव चव्हाण राज्य वाङ्मय पुरस्कार योजना -**

सन २०१२ पासून राज्य वाङ्मय पुरस्कार योजना सांस्कृतिक कार्य संचालनालयाकडून मंडळाकडे हस्तांतरित करण्यात आली. सदर योजना महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाच्यावतीने स्व. यशवंतराव चव्हाण राज्य वाङ्मय पुरस्कार योजना या नावाने राबविण्यात येत आहे. या योजनेअंतर्गत अ) प्रौढ वाङ्मय विभागात २२ वाङ्मय पुरस्कार, ब) बालवाङ्मय विभागात ६ पुरस्कार, क) प्रथम प्रकाशन विभागात ६ पुरस्कार व ड) सरफोजीराजे भोसले बृहन्महाराष्ट्र पुरस्कार १ असे एकूण ३५ राज्य वाङ्मय पुरस्कार मंडळाच्यावतीने प्रदान केले जातात.

**९) ज्येष्ठ साहित्यिकास विंदा करंदीकर जीवन गौरव पुरस्कार -**

साहित्य क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या नामवंत ज्येष्ठ साहित्यिकास, ज्ञानपीठ पुरस्कार प्राप्त साहित्यिक, कै. विंदा करंदीकर यांच्या नावे जीवन गौरव पुरस्कार मंडळाच्यावतीने सन २०१२-१३ पासून प्रदान करण्यात येत आहे. या पुरस्काराचे स्वरूप रु. ५,००,०००/- (अक्षरी रुपये पाच लक्ष फक्त) रोख, मानचिन्ह व मानपत्र असे आहे.

**१०) श्री.पु. भागवत पुरस्कार -**

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाकडून साहित्य निर्मिती क्षेत्रात लक्षणीय व उत्कृष्ट कार्य करणाऱ्या प्रकाशन संस्थेस मराठी प्रकाशन व्यवसायात मोलाचे कार्य करणारे श्री.पु. भागवत यांच्या नावे दरवर्षी पुरस्कार देण्यात येतो. या पुरस्काराचे स्वरूप रु. ३,००,०००/- (अक्षरी रुपये तीन लक्ष फक्त) रोख, मानचिन्ह व मानपत्र असे आहे.

**११) अन्य मराठी साहित्य संमेलनाना अनुदान योजना -**

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाकडून दरवर्षी अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनास रु. ५०.०० लाखाचे अनुदान दिले जाते. या मुख्य साहित्य संमेलनाप्रमाणेच मुख्य मानल्या गेलेल्या प्रवाहापेक्षा वेगळया प्रवाहातील जनसमुहांच्या आणि उपेक्षित वर्गांच्या अन्य मराठी साहित्य संमेलनांना अनुदान देण्यात यावे, या सांस्कृतिक धोरणातील सूचनेनुसार मंडळाकडून दरवर्षी रु.२.०० लाखाचे अनुदान अन्य संमेलनांना देण्यात येते.

**१२) बृहद्ग्रंथ प्रकल्प योजना -**

मराठी भाषा विभाग शासन निर्णय क्र. सासंमं २०१६/प्र.क्र.६०/२०१६/भाषा-३, दि. १३.०५.२०१६ अन्वये महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाच्या वतीने ‘बृहद्ग्रंथ प्रकल्प’ योजना राबविण्यात येते. महाराष्ट्राचे साहित्य, संस्कृती आणि इतिहास यासारख्या विषयांवर मराठीमध्ये ग्रंथ निर्मिती करणे हे महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाचे मुख्य उद्दिष्ट आहे. या मुख्य उद्दिष्टानुसारच सदर योजनेअंतर्गत साहित्य, संस्कृती, कला, इतिहास यासारख्या विषयांवर वैचारिक, सामाजिक, समीक्षात्मक, चरित्रात्मक, वाङ्मयीन संशोधन या विषयांवरील वैविध्यपूर्ण, महत्वपूर्ण, नाविन्यपूर्ण व दुर्मिळ स्वरुपाचे बृहद्ग्रंथ प्रकल्प हाती घेण्यात येऊन महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाकडून प्रकाशित केले जातात.